# मनसेतर्फे पेण येथे नेत्रतपासणी शिबिर संपन्न

पेण : प्रतिनिधी
krushival@hotmail.com

शिबिरात अद्ययावत मशिन्सद्वारे नेत्रतज्ज्ञांकडून चष्म्याचा नंबर दुष्टीपटल, काचबिंदू, डोळ्यांचा प्रेशर आदी विविध प्रकारच्या कॉम्प्युटराईज तपासण्या करण्यात येऊन, पुढील उपचाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट, आय क्लिनिक व महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्या संयुक्त विद्यमाने चावडीनाका-पेण येथे अल्प दरात नेत्रतपासणी शिबिराचे आयोजित करण्यांत आले होते.

मनसेच्या कामगार सेनेचे राज्य कार्यकारिणी सदस्य गोपाळ पाटील यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या या नेत्र तपासणी शिबिराचा येथील अनेक गरजूंनी लाभ घेतला.

या शिबिरात अद्ययावत मशिन्सद्वारे नेत्रतज्ज्ञांकडून चष्म्याचा नंबर दुष्टीपटल, काचबिंदू, डोळ्यांचा प्रेशर आदी विविध प्रकारच्या कॉम्प्युटराईज तपासण्या करण्यात येऊन पुढील उपचाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले. लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट, आय क्लिनिक-पनवेलच्या नेत्रतज्ज्ञ डॉ. मनीषा सानप, सहाय्यक जितेंद्र जाधव व सहकाऱ्यांनी या शिबिरात नेत्र तपासणीचे काम केले.